**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

**राज्य सेवा (पूर्व) परीक्षा - २०१६**

# घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक १० एप्रिल, २०१६ रोजी घेण्यात आलेल्या राज्य सेवा (पूर्व) परीक्षा-२०१६ चा निकाल दिनांक ५ ऑगस्ट, २०१६ रोजी जाहिर करण्यात आला आहे. सदर पूर्व परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या बैठक क्रमांकाच्या याद्या व प्रस्तुत परीक्षेची गुणांची सीमारेषा उमेदवारांच्या माहितीसाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरही प्रसिध्द करण्यात आली आहे.

**२. प्रस्तुत पूर्व परीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून मुख्य परीक्षेसाठी अर्ज करणाऱ्या व परीक्षा शुल्क भरणाऱ्या अर्हताप्राप्त उमेदवारांना मुख्य परीक्षेस प्रवेश देण्यात येईल. या तपासणीनुसार अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल, याची कृपया नोंद घेण्यात यावी. मुख्य परीक्षा दिनांक २४ ते २६ सप्टेंबर, २०१६ या कालावधीत घेण्यात येईल.**

३. प्रस्तुत निकालाआधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना वैयक्तिकरित्या मोबाईल क्रमांकावर एसएमएसव्दारे कळविण्यात येईल. त्यावेळी उमेदवाराने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज व परीक्षा- शुल्क विहित मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

**विजया पडते**
**उपसचिव (परीक्षा)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

**मुंबई**
**दिनांक:- ५ ऑगस्ट, २०१६.**